3 0 MAY 2017
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**अर्ज जमा करण्यास मुदतवाढ : विद्यापीठातील एम. फिल., पीएच.डी. अभ्यासक्रम**

# ९१२ जागांसाठी पाच हजारांवर अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एक वर्षानंतर शिवाजी विद्यापीठाकडून एम. फिल. आणि पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. संशोधनविषयक या दोन्ही अभ्यासक्रमांसाठी यंदा एकूण ९१२ जागा उपलब्ध असून, त्यासाठी विद्यापीठाकडे ५ हजार ७४ विद्यार्थी-विद्यार्थिनींचे अर्ज दाखल झाले आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) गेल्या वर्षी मार्गदर्शकांबाबत निकष बदलले होते. त्यामुळे विद्यापीठातील एम. फिल., पीएच. डी. अभ्यासक्रमांचे मार्गदर्शक कमी होणार होते. याबाबत फेरविचार होण्याची मागणी विद्यापीठांकडून झाली होती. या मागणीनुसार यूजीसीने निकषांमध्ये बदल केले. शिवाय या दोन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या निकषांमध्ये काही बदल केले होते. या बदलाच्या प्रक्रियेला उशीर झाल्याने गेल्या वर्षी विद्यापीठाकडून प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली नव्हती. या वर्षी विद्यापीठाने या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला.

विद्यापीठातील एम. फिल. अभ्यासक्रमाच्या २२ विषयांसाठी २११ आणि पीएच. डी.च्या ४७ विषयांची ७०१ इतकी प्रवेश क्षमता आहे. अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत २४ एप्रिल ते २० मेदरम्यान होती. या कालावधीत एम. फिल.साठी २६० आणि पीएच. डी.साठी ४१५१ अर्ज दाखल झाले आहेत. काही विद्यार्थी-विद्यार्थिनींना एम. फिल. आणि पीएच. डी. अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा द्यावयाची असते. यात ज्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेत चांगले गुण मिळतील, त्याला प्रवेशित व्हावयाचे असते. अशा दोन्ही अभ्यासक्रमांसाठी ६६३ जणांनी अर्ज भरले आहेत. ऑनलाईन अर्जाची स्थळप्रत विद्यापीठाकडे जमा करण्याची मुदत २५ मेपर्यंत होती. ही मुदत ३ जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे.

दरम्यान, या वर्षीच्या एम. फिल., पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी २०, २१ आणि २२ जूनला प्रवेश परीक्षा घेण्याची तयारी सुरु आहे. ऑफलाईन पद्धतीने ओएमआर शीटद्वारे परीक्षा घेण्यात येणार असल्याचे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.

## जुलै अखेरपर्यंत प्रक्रिया पूर्ण करणार



मार्गदर्शक आणि पीएच. डी., एम. फिल.बाबतच्या निकषांत यूजीसीकडून गेल्या वर्षी बदल झाले. संबंधित बदल निश्चितीसाठी काहीसा अधिक वेळ लागल्याने विद्यापीठाला प्रवेश प्रक्रिया राबविता आली नव्हती, असे प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. ते म्हणाले, यावर्षी विद्यापीठाने वेळेत प्रवेश प्रक्रिया सुरु केली. विद्यापीठातील एम. फिल., पीएच. डी. अभ्यासक्रमांच्या उपलब्ध जागांच्या तुलनेत विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून दाखल झालेल्या अर्जांची संख्या मोठी आहे. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसाठी प्रश्नपत्रिका, केंद्रनिश्चिती, आदी स्वरुपांतील तयारी करून जूनच्या तिसऱ्या आठवड्यात प्रवेश परीक्षा घेतली जाईल. प्रवेशाची प्रक्रिया जुलैअखेरपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

30 MAY 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंजिनीअरिंगच्या प्रवेशासाठी नवीन पर्याय

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

- शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात ३४ अभियांत्रिकी कॉलेज
- प्रथम वर्षासाठी १३ हजार जागा
- प्रवेश प्रक्रियेसाठी होणार तीन फेऱ्या
- रिक्त जागांसाठी ३ ऑगस्टला जादा फेरी
- कोल्हापूरात चार सुविधा केंद्र

- प्रवेश अर्ज भरणे आणि कागदपत्रांची छाननी - ५ ते १७ जून
- कच्च्या गुणवत्ता यादीची प्रसिद्धी - १९ जून
- अंतिम गुणवत्ता यादी - २२ जून
- पहिल्या फेरीसाठी रिक्त जागांची माहिती - २२ जून
- विकल्प भरावयासाठी - २३ ते २६ जून
- पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध - २८ जून
- विकल्प भरण्याची दुसरी फेरी - ५ ते ८ जुलै पर्यंत
- पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची दुसरी यादी प्रसिद्ध - १० जुलै
- तिसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांची माहिती - १६ जुलै
- विकल्प बदलाबाबत - १६ ते १९ जुलै
- पात्र विद्यार्थ्यांसाठी तिसरी यादी - २१ जुलै.

**पाच जूनपासून प्रवेश प्रक्रिया**

यंदाच्यां शैक्षणिक वर्षातील इंजिनीअरिंगच्या प्रथम वर्षाच्या १३ हजार जागांसाठी ५ जूनपासून प्रवेश प्रक्रिया सुरु होणार आहे. गतवर्षीपासून कॉलेज निवडण्यासाठी नवीन पर्याय उपलब्ध करुन दिले असून त्यातून विद्यार्थ्यांना चांगले कॉलेज निवडण्याची संधी आहे. फक्त विद्यार्थी व पालकांनीही कॉलेज निवडण्यासाठी प्रक्रियेचा व त्यातील पर्यायांचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सामायिक प्रवेशपूर्व परीक्षा कक्षाने वेळापत्रक जाहीर केले आहे. या प्रक्रियेमध्ये सुविधा केंद्रांची भूमिका महत्त्वाची असते. या केंद्रांमध्ये विद्यार्थी व पालकांना विविध माहिती उपलब्ध करून दिली जाते. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यात शंका उपस्थित होऊ नये, यासाठी सुविधा केंद्र महत्त्वाची भूमिका बजावत असतात. याबाबत नेहमीच्या काही कॉलेजकडून मागणी झाली आहे. पण अजूनपर्यंत या केंद्रांची निश्चिती करण्यात आलेली नाही. पाच जूनपासून प्रक्रिया सुरू होणार असल्याने एक जूनच्या आसपास केंद्र जाहीर होण्याची शक्यता आहे. ही केंद्रे रविवार आणि सुटीच्या दिवसांसह सर्व दिवस खुली ठेवण्यात येतात.

यावर्षी नीट परीक्षा स्वतंत्र घेण्यात आली. तरीही इंजिनीअरिंग व फार्मसीची सीईटी परीक्षा जिल्ह्यातील १४ हजारावर विद्यार्थ्यांनी दिली. गेल्यावर्षी कॉलेज निवडीसाठीच्या फेऱ्यांसाठी फ्रीज, फ्लोट व स्लाईड हे नवीन पर्याय देण्यात आले होते. पण त्याची माहिती नसल्याने त्यांचा फायदा झाला नाही. यातून चांगले कॉलेज निवडण्याची संधी आहे. तसेच यंदा चार फेऱ्यांपेक्षा तीनच प्रवेश फेऱ्या केल्या आहेत. याशिवाय शेवटच्या टप्प्यात गव्हर्न्मेंट कॉलेज व स्वायत्त कॉलेजसाठी ३ ऑगस्टला स्वतंत्र प्रवेश फेरी होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करायचे असून त्यानंतर प्रवेश निश्चितीची केंद्रेही अजून जाहीर करण्यात येणार आहेत. सुविधा केंद्रांची यादी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in/fe2017 यां वेबसाइटवर मिळणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2017
Times of India

# SUK invites applications for regular courses

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited applications for MA, MCom and all other degree and certificate courses.

An SUK circular read, "All these exams do not require an entrance examination. Students can submit theri applications online."

Registrar at SUK Vilas Nandavadekar said, "The last date of filling up the application form is June 9. Students can visit the official website- https:\\online.shivajiuniversity.in for more information."

"Students can fill their form through an online payment gateway or offline through conventional offline payment facility," he said.

Students filling the online application forms will have to make sure that a hard copy of their application form along with relevant documents should reach their respective departments on or before June 13. Applications reaching late will not be entertained," he added.

Students can visit the admission 2017 link which has been made available at the SUK website.

"For any query students can also reach the SUK officals at their landline numbers 0231-2609142, 2609488, 2609489. A challan facility to has also been made available for the students in the administration block in room number 107," the circular added.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2017
पुढारी

# अभियांत्रिकी प्रवेशाबाबत मार्गदर्शन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तंत्रज्ञान अधिविभाग शिवाजी विद्यापीठ व दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (कोल्हापूर सेंटर) यांच्या वतीने १२ वी सायन्स उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी 'अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१७' या विषयावर मार्गदर्शनाचे आयोजन केले आहे. २ जून रोजी दुपारी ३.३० ते ६.३० या वेळेत केशवराव भोसले नाट्यगृह येथे हे मार्गदर्शन होणार आहे. याचा पालक, विद्यार्थी यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले आहे.

3 0 MAY 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग व दि इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूर लोकल सेंटरतर्फे शुक्रवारी (ता.२) बारावी (सायन्स) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व पालकांसाठी अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१७ या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होत आहे.

संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात दुपारी साडेतीन ते साडेसहा या वेळेत मार्गदर्शन होईल. कार्यक्रमामध्ये अभियांत्रिकीच्या विविध विद्याशाखा व त्यातील संधी तसेच केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१७ या विषयी विस्तृत मार्गदर्शन व शंकानिरसन करण्यात येणार आहे, तरी विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2017
महाराष्ट्र टाईम्स



# विद्यापीठाच्या वतीने शुक्रवारी चर्चासत्र

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग, दि इस्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स इंडिया आणि कोल्हापूर लोकल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (ता. २ जून) संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह येथे विद्यार्थी व पालकांसाठी चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रकिया या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तसेच विद्यार्थी व पालकांचे शंकासमाधान करण्यात येणार आहे. दुपारी साडेतीन ते साडेसहा या वेळेत चर्चासत्र होईल. विद्यार्थी व पालकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठाने घेतले बसर्गे गाव दत्तक

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाने बसर्गे हे गाव दत्तक घेतले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार व जलसंधारण शिबिराच्या उदघाटन प्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी ही घोषणा केली. शिबिरामध्ये बसर्गेच्या ओढ्यावरील मुख्य बंधाऱ्यातील गाळ काढणे तसेच सर्व वॉर्ड मधील घरांचे सर्वेक्षण हे मुख्य उपक्रम राबवण्यात आले. विद्यार्थी व ग्रामस्थांसाठी योगवर्ग, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले.

एनएसएसच्या माध्यमातून बसर्गे गावाचा विकास आराखडा तयार करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. शिबिराच्या उदघाटन प्रसंगी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे मुख्य समन्वयक डॉ. दत्तात्रय गायकवाड यांनी शिवाजी विद्यापीठ व एबी सॉफ्टच्या सहकार्यातून बसर्गे गावाचे संकेतस्थळ तयार करणार असल्याचे जाहीर केले. वर्षभरात बसर्गेमध्ये डिजिधन, जनधन, जीवनज्योती बिमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना, अटल बिमा योजना, ठिबक सिंचन, जलसंधारण, विहीर पुनर्भरण, रेनवॉटर हार्वेस्टिंग आदींचे जनजागरण केले जाईल. कार्यक्रमाचे अध्यक्ष व पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे तज्ज्ञ संचालक डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एकशे दहा ट्रॉली गाळ काढण्यात आला. शिबिरामध्ये महागावचे प्रा. पी. डी. पाटील, उत्तूरचे प्रा. राजेंद्र ठाकूर, कोल्हापूरचे डॉ. अभिजित मुसळे, गारगोटीच्या केतकी पाटकर - ठाकूर यांनी मार्गदर्शन केले.

गडहिंग्लज पंचायत समिती सभापती प्रा. जयश्री तेली, गटविकास अधिकारी सीमा जगताप, पोलिस निरीक्षक बिपीन हसबनीस, जिल्हा परिषद सदस्य हेमंत कोलेकर, रेखाताई हत्तरकी, वर्षादेवी नाडगोंडे, गंगाधर व्हसकोट्टी यांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले. शिबिराच्या व्यवस्थापनाची धुरा प्रा. संजीवनी पाटील, प्रा. डी. जी. चिंगळीकर आणि सेवावर्धिनी संस्थेचे गुरुनाथ कुलकर्णी, अनुलोम संस्थेचे विजय हिरेमठ यांनी सांभाळली. उपसरपंच सुरेश मणिकेरी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थांचे त्यांना सहकार्य लाभले.